**<u>अर्जदार यांचा साक्षीदार क्र. 2 चा उलटतपास : सामनेवालातर्फे श्री. राजाराम मुळे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

2. महानगरपालिका प्राथमिक शाळा, अशोकनगर मी प्रभारी मुख्याध्यापक असताना अर्जदार हे वॉचमन म्हणून महाराणा सेक्युरिटी एजंसीमार्फत होते. अर्जदार यांना महानगरपालिकेकडून नियुक्तीपत्र देण्यात आलेले नाही. अर्जदार यांनी 2016 ते 2019 या कालावधीमध्ये महाराणा सेक्युरिटी एजंसीमार्फत शाळेत वॉचमन म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मुख्याध्यापक म्हणून अर्जदार यांचे दर महिन्याचे हजेरीपत्रक प्रमाणीत करून महाराणा सेक्युरिटी एजंसीकडे पाठवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांना महिन्याचे हजेरी पत्रकाप्रमाणे महाराणा सेक्युरिटी एजंसीद्वारे पगार दिला जात होता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व महानगरपालिका औरंगाबाद प्रतिवादी यांच्यामध्ये मालक व कामगार नातेसंबंध कधीही आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांचा पगार सन 2016 ते 2019 या कालावधीतील महानगरपालिकेने महाराणा सेक्युरिटी एजंसीला या पुर्वीच दिलेला आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.07 15:27:33 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–06/03/2026